क्र.CIC/अ.क्र.६१३५ ते ६१५१/२०२६

श्री.संजय एम.म्हात्रे,
खोली क्र.५३४,इमारत क्र.०३,
५वा मजला,बी-विंग,अल्टा-विस्टा
एस.आर.ए.लालडोंगर,सायन-ट्रॉम्बेरोड, चेंबूर,मुंबई-४०० ०७१.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (रस्ते), एम./प.
पूर्व उपनगरे, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७५.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते),
पूर्व उपनगरे, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७५.
(अपिल क्र.६१३५/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (रस्ते), एस विभाग,
पूर्व उपनगरे, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७५.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते),
पूर्व उपनगरे, एल व एम/प. विभाग, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७५.
(अपिल क्र.६१३६/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा.उद्यान अधिक्षक, ई-विभाग कार्यालय,
भायखळा, मुंबई-४०० ००८.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (बागबगीचा व उद्याने),
ई-विभाग कार्यालय, भायखळा, मुंबई-४०० ००८.
(अपिल क्र.६१३७/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (एम्/पूर्व), पजवा, पूर्व उपनगरे,
पंतनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (एम्/पूर्व), पजवा, पूर्व उपनगरे,
पंतनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५.
(अपिल क्र.६१३८/२०२६ ते ६१४०/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता, (एल), पजवा, पूर्व उपनगरे,
पंतनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पजवा, पूर्व उपनगरे,
पंतनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५.
(अपिल क्र.६१४१/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता, (परि.), एल् विभाग,
कुर्ला, मुंबई-४०० ०७०.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (परि.), एल् विभाग,
कुर्ला, मुंबई-४०० ०७०.
(अपिल क्र.६१४२/२०२६ ते ६१४४/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (एम्/पूर्व),
गोवंडी, मुंबई-४०० ०४३.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (परिरक्षण),
गोवंडी, मुंबई-४०० ०४३.
(अपिल क्र.६१४५/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता पी/दक्षिण विभाग,
गोरेगांव, मुंबई-४०० १०४.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (परिरक्षण),
गोरेगांव, मुंबई-४०० १०४.
(अपिल क्र.६१४६/२०२६ व ६१५१/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता, (एम्/पश्चिम), पजवा, पूर्व उपनगरे,
पंतनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
(एम्/पश्चिम), पजवा, पूर्व उपनगरे,
पंतनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५.
(अपिल क्र.६१४७/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता, एन् विभाग, पूर्व उपनगरे,
पंतनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
एन् विभाग, पूर्व उपनगरे,
पंतनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५.
(अपिल क्र.६१४८/२०२६ व ६१४९/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता, के/प. विभाग,
अंधेरी, मुंबई-४०० ०५८.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
के/प. विभाग, अंधेरी, मुंबई-४०० ०५८.
(अपिल क्र.६१५०/२०२६)

<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.०७.२०२६</u>

अपीलकर्ता	:	उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	अनुपस्थित

अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या १७ द्वितीय अपील अर्जांमध्ये सुनावणीस अपीलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी वा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०१.१२.२०१५ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकात माहिती आयोगापुढे सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी प्राधान्याने उपस्थित राहणे हे बंधनकारक असल्याचे निर्देश मा.मुख्य सचिव यांनी याआधीच दिलेले असतानाही उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी उपस्थित नसल्याने या सर्वांविरुद्ध दिनांक ०१.१२.२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार कारवाई का करण्यात येऊ नये याचा खुलासा सादर करावा तसेच उपरोक्त परिपत्रकाच्या दृष्टीने प्रशासकीय पातळीवर संबंधितांविरुद्ध प्रस्तावित प्रशासकीय कार्यवाहीबाबत आयोगास अवगत करण्यात यावे.

यातील माहितीचा कालावधी साधारण सन २०२० ते २०२१ या कालावधीतील असून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभाग, विविध प्राधिकरण यांच्याकडून महानगरपालिकेच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या अनेक उद्याने / मैदाने यांच्या दुरुस्ती व सौंदर्यीकरणाची कामे, सुशोभिकरण इ. बाबतीत राबविण्यात आलेल्या निर्णय प्रक्रिया, विविध कंत्राटदारांना देण्यात आलेली कंत्राट कामे, त्यांनी केलेली कामे, संपर्क क्रमांक, परवाना, कर्मचारी वर्ग या सर्व बाबी माहिती अर्जात मागितल्या आहेत. काही प्रकरणांत माहिती प्राप्त झाली नाही तसेच अपिल सुनावणी घेण्यात आलेली नाही असे अपिलार्थींनी त्यांच्या द्वितीय अपिल अर्जात नमूद केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने Kisan Chand Jain Vs. Union of India मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, या प्रकरणात दि. १७ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या निर्णयानुसार **कलम ४** अन्वये सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यालयातील अधिकाअधिक माहिती ही स्वंयप्रेरणेने उघड करण्याबाबत सुचीत केले आहे. तसेच **कलम ४ (१) (ख)** विशेषत: त्यातील **कलम ४ (१) (११)** यात सर्व योजनेचे तपशिल, प्रस्तावित खर्च दर्शविणारा आपल्या प्रत्येक प्राधिकरणाने नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रक्कमांच्या अहवालाची माहिती संकेतस्थळावर वारंवार अद्यावत करण्याबाबत कायदेशीर बंधनकारक आहे. तसेच **कलम ४ (१) (ग) व (ख)** नुसार यात देखील ज्यामुळे लोकांना बाधा पोहचण्याची, महत्वाची धोरणे आखताना असे निर्णय जारी करतांना सर्व वस्तुस्थिती प्रसिध्द करीत **कलम ४ (१) (ख)** नुसार प्रशासकीय / न्यायिक बाधित व्यक्तींना कळविणे अशी स्पष्ट तरतूद कायद्यात असून **कलम ४ (२)** यात माहिती मिळविण्यासाठी लोकांना अधिनियमाचा कमीकमीत आधार घ्यावा लागावा यासाठी नियमित, कालांतराने लोकांना इंटरनेटसह, संपर्कच्या विविध साधनांद्वारे,स्वत:हून माहिती पुरविण्यासाठी **पोटकलम (१) च्या खंड (ख)** च्या आवश्यकते नुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशिल राहील. तसेच **कलम ४ (१) (३)** च्या प्रयोजनांसाठी प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल आणि अशा स्वरूपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल. **कलम ४ (४)** यातील तरतुदीनुसार पुरेपूर मोबदला देणारा खर्च, स्थानिक भाषा आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वांत प्रभावी पद्धती या बाबी विचारात

घेऊन सर्व माहिती प्रसारित करण्यात येईल, आणि यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे शक्यतो इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ती माहिती मोफत किंवा सशुल्क विहित करण्यात येईल इतक्या माध्यमाच्या खर्चाएवढ्या किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढ्या किमतीला सहजपणे उपलब्ध असावी.

वरील कागदपत्रांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या उपरोक्त आदेशान्वये या आधीच स्वयंस्पष्ट सूचना दिल्या असून अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती ही व्यापक व विस्तृत स्वरुपाची असून यातील बरीचशी माहिती प्राधिकरणांनी या आधीच संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली असली तरी अशा प्रकारची माहिती संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेणे व्यवहार्यरित्या अशक्य व सामान्य माणसांना सुलभतेपणे आवश्यक ती माहिती शोधून काढणे अवघड होऊन जाते. ज्या प्रकरणी त्यांनी शुल्क भरले आहे, अशा प्रकरणांची माहिती शक्यतो दस्तऐवज स्वरुपात प्रदान करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणी **कलम ४ (१) (ख)** यातील सर्व तरतुदींचे अवलोकन केल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने Kisan Chand Jain Vs. Union of India या प्रकरणात दिलेल्या दिशा निर्देशाप्रमाणे तसेच मा.राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी दि.२९.०४.२०२५ रोजी जारी केलेल्या निर्देशाप्रमाणे यातील ज्या प्रकरणात माहिती प्रदान करण्यात आलेली नाही. मात्र शुल्क भरलेले आहेत अशा प्रकरणात अपीलार्थी यांनी भरलेल्या शुल्काप्रमाणे कार्यालयीन अभिलेखात **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी सूचित केलेली सर्व माहिती प्रदान करण्यात यावी. उर्वरित प्रकरणांत अपीलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज मंजूर करीत उपलब्ध असलेली व देय असलेली व **कलम ४ (१) (ख) (११)** यांचा अंर्तभाव असलेली सर्व माहिती ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभाग व उप विभाग यांनी त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावी. उपरोक्त माहिती कशा प्रकारे प्राप्त करुन घ्यावी यासंदर्भातील मार्गदर्शन (Path) हे देखील स्वत:च्या संकेतस्थळावर प्रकट करावा. इतक्या मोठया प्रमाणावरील विस्तृत माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या तज्ञांनी जन माहिती अधिकारी यांना तांत्रिक सहाय्य प्रदान करणे आवश्यक असल्याने मा. महानगरपालिका आयुक्त यांना अशी सूचना देण्यात येते की, संबंधित अधिकारी यांना याबाबतीत योग्य ते दिशा निर्देश जाहिर करुन कालबध्द स्वरुपात व अशा प्रकारची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यवाही करुन योग्य त्या जबाबदार व ज्येष्ठ अधिकाऱ्यांमार्फत अशा प्रकारची माहिती संकेतस्थळावर अद्यावत करुन सहज व सुलभरित्या उपलब्ध करुन दिली असल्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

सर्व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती पुढील १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या तज्ञांचे तांत्रिक सहाय्य घेऊन बहुतांश माहिती ही कुठल्याही परिस्थितीत पुढील चार आठवडयाच्या आत महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करुन योग्य त्या जबाबदार वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत अशा

प्रकारची माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करुन सहज व सुलभरित्या उपलब्ध करुन दिली असल्याचा अनुपालन अहवाल हा दि. १७.०८.२०२६ रोजी सादर करण्यात यावा, अन्यथा या प्रकरणात या आधी झालेला विलंब लक्षात घेता, **कलम १९ ८ (ग), २० (१) व २० (२)** नुसार प्रत्येक अधिकाऱ्यांवर कायदातील नमूद कार्यवाहीची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. तसेच ज्या प्रकरणांमध्ये शुल्क भरलेले आहे परंतु अपीलार्थी यांना माहिती प्रदान करण्यात आलेली नाही अशा प्रकरणांतील सर्व शुल्क अपीलार्थीस उपरोक्त आदेश प्राप्त होताच तात्काळ परत करण्यात यावे. वरील निर्देशासह उपरोक्त सर्व द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहेत.

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

२. **अपिल क्र. ६१३५ ते ६१५१/२०२६ निकाली काढण्यात येत आहेत.**

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १५-०७-२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**